VOL- IX ISSUE- II FEBRUARY 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x

# शिक्षणाची संकल्पना व शिक्षणाचे प्रकार

**डॉ. शशिकांत अन्नदाते**
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर

मानवाला जीवनात विविध अनुभव येत असतात. या अनुभवानुसार मानव आपल्या कृतीत, स्वभावात आणि वर्तनामध्ये बदल करत असतो, या बदलास शिक्षण असे म्हणतात. मानवी सदगुण व सदाचार म्हणून शिक्षणाला जीवनात खूप महत्व आहे. शिक्षणाविना मनुष्य पशुसमान आहे हे सिद्ध झाले आहे.

**शिक्षणाचा व्युत्पत्ती नुसार अर्थ**

१. "शिक्षण" हा शब्द 'शिक्ष' याधातूपासून तयार झाला आहे. शिक्षण या संस्कृत शब्दाचा अर्थ 'उपदेश करणे' असा आहे, यामध्ये गुरूने शिष्याला उपदेश करून त्याच्या वर्तनात बदल घडवून आणणे अपेक्षित आहे.

२. शिक्षणाला इंग्रजीत "Education" असे म्हणतात. Education इंग्रजी शब्द हा लॅटीन भाषेतील 'To Educare' शब्दापासून आला आहे. त्याचा एक अर्थ "To bring up" म्हणजे पालन पोषण करणे, संगोपन करणे असा आहे. दुसरा अर्थ "To lead out, to draw out" म्हणजे व्यक्तीच्या सुप्त गुणांना जागृत करणे असा आहे.

याआधारे "विकसनशील, अननुभवी बालकांच्या जन्मजात शक्तींना, उपजत गुणांना वळण लावून त्यांचा विकास करणे म्हणजे शिक्षण होय." अशी व्याख्या करता येते.

**शिक्षणाच्या भारतीय विचारवंत यांच्या व्याख्या**

१. **शंकराचार्य** – "शिक्षण म्हणजे आत्मसाक्षात्कार"

२. **स्वामी विवेकानंद** – "मानवातील उपजत दैवी गुणांची अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण होय."

३. **महात्मा गांधी** – "मानवाच्या शारीरिक, मानसिक व अध्यात्मिक अंगांमधील उत्कृष्टतेचा विकास व अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण होय."

४. **डॉ.** बाबासाहेब आंबेडकर – "व्यक्तीला त्याच्या अस्तित्वाची, क्षमतांची व सामर्थ्याची जाणीव करून देते ते म्हणजे शिक्षण होय."

५. **आचार्य विनोबा भावे** – "सुप्तनिद्रस्त शक्ती जागृत करण्याचे एक साधन म्हणजे शिक्षण होय"

६. **रविंद्रनाथ टागोर** – "शिक्षण म्हणजे आत्माविष्कार होय."

**शिक्षणाच्या भारतीय विचारवंत यांच्या व्याख्या**

१. **प्लेटो** – "मानवाचे शरीर व आत्मा यांच्यातील उत्कृष्टतेचा पुर्णत्वाप्रत विकास म्हणजे शिक्षण होय."

२. **ॲरिस्टॉटल** – "निरोगी शरीरात निरोगी मनाचा विकास करणे म्हणजे शिक्षण होय."

३. **जॉन ड्युई** – "शिक्षण म्हणजे सातत्याने अनुभवांची पुनर्रचना करीत जीवन जगण्याची प्रक्रिया होय."

४. **रुसो** – "शिक्षण म्हणजे बालकांच्या नैसर्गिक आंतरिक शक्ती व क्षमतेचा विकास होय."

**शिक्षणाची संकुचित व व्यापक संकल्पना –**

अ. **संकुचित संकल्पना** – शाळेत, महाविद्यालयात जाणे म्हणजे शिक्षण घेणे होय. तसेच परीक्षा देणे, पदव्या घेणे किंवा केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण होय, ही शिक्षणाची संकुचित व्याख्या आहे. यानुसार ज्ञान व माहिती संपादन करण्याला शिक्षण म्हणण्याचा प्रघात आहे. पण हे खऱ्या अर्थाने सत्य नाही.

ब. **व्यापक संकल्पना** – शिक्षण म्हणजे व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण व संपूर्ण विकास होय. यामध्ये ज्ञानसंवर्धन,

बौद्धिक व वैचारिक विकास, व्यावहारिक कार्यक्षमता, शारीरिक स्वास्थ, आदर्श नागरिकत्व, सामाजिकता, सौंदर्याभिरुची, रसिकता, नैतिकता, क्रियाशीलता व सृजनशीलता या सर्व घटकांचा समावेश होतो. थोडक्यात यात केवळ ज्ञान किंवा साक्षरता यावर भर न देता मानवी जीवनाच्या सर्व पैलूंचा विचार केला जातो.

**शिक्षणाचे प्रकार –**

शिक्षण ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. मानव जन्मापासून ते मृत्यूपर्यंत काही ना काही सतत शिकत असतो, म्हणून आज शिक्षणाला आजन्म शिक्षण असे म्हटले जाते.

शिक्षण हे कोणाला, कोठे, केव्हा व कशा प्रकारे दिले जाते यावरून शिक्षणाचे पुढील प्रकारात वर्गीकरण केले जाते.

**१. औपचारिक शिक्षण (Formal Education)**

"विशिष्ट यंत्रणेमार्फत, निश्चित ध्येय समोर ठेवून, नियोजनपूर्वक दिल्या जाणाऱ्या शिक्षणाला औपचारिक शिक्षण असे म्हणतात." औपचारिक शिक्षण शाळा, महाविद्यालय व व्यावसायिक शिक्षण संस्था यामधून दिले जाते.

औपचारिक शिक्षणात विद्यार्थ्याला शिक्षण घेण्यासाठी शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घ्यावा लागतो. अभ्यासक्रमाची निवड करावी लागते. नियम व शिस्त यांचे पालन करावे लागते आणि शैक्षणिक हेतूविषयी जागृत राहून प्रत्येक वेळी वर्गातील अध्ययन अनुभवाचे ग्रहण व संपादन करावे लागते.

**औपचारिक शिक्षणाची वैशिष्ट्ये**

- औपचारिक शिक्षण शास्त्रशुद्ध, पद्धतशीर व पूर्वनियोजित असते.
- अभ्यासक्रम, वेळापत्रक, अध्यापन पद्धती, विद्यार्थी, शिक्षक, व्यवस्थापन यांना महत्वाचे स्थान असते.
- शिक्षण देणे व घेणे या क्रिया जाणीवपूर्वक चालतात.
- परीक्षेत उत्तीर्ण, अनुतीर्ण, व पदवी यास महत्व असते.
- नियम व शिस्त महत्वाची असते.
- व्यावहारिक जीवनात या शिक्षणास महत्वाचे स्थान असते.

**औपचारिक शिक्षणाचे महत्व**

- औपचारिक शिक्षणामध्ये विद्यार्थी व शिक्षक एकत्रित कार्यरत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययन अनुभवानुसार, अध्यापन कार्यनितीत बदल करता येतो. यामुळे शिक्षणाचे ध्येय साध्य होते.
- औपचारिक शिक्षणामध्ये विद्यार्थ्यास एखाद्या विषयात प्राविण्य मिळवण्यासाठी विशिष्ट कालावधी देण्यात येतो. त्याआधारे परीक्षेच्या माध्यमातून प्राविण्य मिळवले कि नाही हे ठरवले जाते. प्राविण्य मिळवल्यास प्रमाणपत्र बहाल करण्यात येते. यामुळे विद्यार्थ्याचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होते.
- औपचारिक शिक्षणामुळे आपणास तज्ञ, प्रशासक, अभियंता, शिक्षक व प्रतिभावंत यांचा शोध घेता येतो.

उद्योगप्रधान संस्कृतीमुळे विशिष्ट ज्ञान व कौशल्य आत्मसात करण्यासाठी औपचारिक शिक्षणाची गरज वाढली आहे. त्याचप्रमाणे पालक नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने घराबाहेर जात असल्याने त्यांना मुलांकडे लक्ष देणे शक्य नसते, त्यामुळे औपचारिक शिक्षणाची गरज निर्माण झाली आहे.

**२. अनौपचारिक शिक्षण (Non-Formal Education)**

व्यक्ती जन्माला आल्यापासून तिचा विविध संस्थाशी संबंध येतो, यातून तिला विविध अनुभव येतात, या अनुभवानुसार व्यक्तीच्या आचारात-विचारात बदल घडून येतो. मात्र या अनुभवांमध्ये निश्चितता, पद्धतशीरपणा, सुसंगती, पूर्व नियोजन नसते तसेच व्यक्तीला आपण शिकत आहोत याची जाणीवही नसते अशा अनुभवातून मिळणाऱ्या शिक्षणाला अनौपचारिक शिक्षण असे म्हणतात. आंतरराष्ट्रीय आयोगाने "सतत शिकत राहणे म्हणजे अनौपचारिक शिक्षण होय." अशी व्याख्या केली आहे. ज्ञानदान, कौशल्याची ओळख व विकास आणि मूल्यशिक्षण हि अनौपचारिक शिक्षणाची मुख्य उद्दिष्टे आहेत.

**अनौपचारिक शिक्षणाची केंद्रे**

अनौपचारिक शिक्षण ज्या संस्थांच्या माध्यमातून मिळते, त्यांना अनौपचारिक संस्था असे म्हणतात. उदा. कुटुंबसंस्था, समाजव्यवस्थेतून येणारे अनुभव, भाषा, धर्म, संस्कृती, शासनसंस्था, बोधपट, आकाशवाणी, दूरचित्रवाणी, मासिके, वृत्तपत्रे, ग्रंथालये, मुक्त शिक्षण संस्था इत्यादी.

अनौपचारिक शिक्षण हि आधुनिक संकल्पना आहे. हे शिक्षण समूह संपर्क माध्यमे व मुक्त शिक्षण संस्था यांच्या माध्यमातून देता येते.

**अनौपचारिक शिक्षणाची उद्दिष्टे**

- अनौपचारिक शिक्षणामध्ये शिक्षण देणारा आणि शिक्षण घेणारे हे एकमेकांपासून अनेक वेळा दूर अंतरावर असतात.
- अनौपचारिक शिक्षण हे समूह संपर्क माध्यमे व मुक्त संस्थांच्या माध्यमातून देता येते.
- अनौपचारिक शिक्षणामुळे ज्ञान व कौशल्यात वाढ होते.
- अनौपचारिक शिक्षणा हे औपचारिक शिक्षण व सहज शिक्षण याच्या दरम्यानचे शिक्षण आहे.

**अनौपचारिक शिक्षणाचे महत्व**

- अनौपचारिक शिक्षणाचा जीवन हा केंद्रबिंदू आहे. व्यवसाय सांभाळून मिळणाऱ्या वेळेचा जास्तीत जास्त उपयोग करून घेऊन अर्धवेळ अथवा स्वत:च्या वेळेनुसार शिक्षण घेता येते. स्वत:च्या अभिरुचीनुसार गुणवत्ता व कौशल्ये वाढवता येतात.
- अनौपचारिक शिक्षणामुळे फावल्या वेळेचा सदुपयोग करता येतो.
- अनौपचारिक शिक्षणाच्या माध्यमातून मिळवलेल्या पदवीचा उपयोग नोकरीसाठी, नोकरीमधील पदोन्नतीसाठी होतो.
- अनौपचारिक शिक्षणामुळे आपले छंद जोपासता येतात.

**सहज शिक्षण (Informal Education)**

शिक्षण ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. आपण प्रत्येक क्षणाक्षणाला काहीतरी नवीन अनुभव घेत असतो. या अनुभवातून वर्तन परिवर्तन घडते, यास सहज शिक्षण असे म्हणतात. सहज शिक्षणास प्रासंगिक शिक्षण असेही म्हणतात.

१. "जीवन जगण्याच्या स्वभाविक प्रक्रीयेमध्ये जे ज्ञान प्राप्त होते, त्याला सहज शिक्षण म्हणतात."

२. "ज्या वातावरणात आपण जगतो, राहतो, वाढतो व त्यातून जे शिक्षण मिळते त्यास सहज शिक्षण म्हणतात."

जीवनातील सर्वच अनुभव आपणास शाळा, महाविद्यालयातून मिळत नाहीत, आपले कुटुंबीय, मित्र, समाज, विविध संस्थांच्या भेटी, शिबिरे, चर्चा यामधून आपणास अनेक अनुभव मिळतात. उदा. मोठ्यांचा आदर करणे, उजव्या हाताने अन्नग्रहण करणे, एकमेकांच्या सुख दु:खात सामील होणे. ही कौशल्ये किंवा मुल्ये शाळेत न जाता कुटुंबाकडून किंवा समवयस्काकडून सहजगत्या आत्मसात केल्या जातात त्यामुळे या शिक्षणास सहज शिक्षण असे म्हणतात.

**सहज शिक्षणाची वैशिष्ट्ये**

- साचेबंदपणा, योजनाबद्धता व पूर्वनियोजन नसते.
- शिकण्यामागे विशिष्ट हेतू असत नाही.
- शिक्षणाचा हे उत्स्फूर्त, सहज व स्वयंप्रेरित असते.
- शिकण्यासाठी वेळापत्रक, अभ्यासक्रम, परीक्षा नसते.
- दैनदिन जीवनात विविध प्रसंगातून सहज शिक्षण मिळते.

**सहज शिक्षणाचे महत्व**

- जीवन कौशल्ये व मुल्ये याचे शिक्षण सहज शिक्षणातून मिळत असल्यामुळे सहज शिक्षण महत्वाचे ठरते.
- सहज शिक्षणात साचेबंदपणा नसल्यामुळे आपण विविध अनुभवातून हे शिक्षण घेऊ शकतो.
- सहज शिक्षण हे आपल्या परिसरातील अनुभवावरून मिळत असल्या कारणाने व्यक्तीला काळ, वेळ किंवा भाषेचे बंधन नसते. हे शिक्षण विविध स्त्रोतांच्या माध्यमातून घेता येते. त्यामुळे तुलनात्मक अध्ययन करता येऊन अध्ययनात दर्जेदारपणा येतो.
- सहज शिक्षणात कोणत्याही प्रकारची औपचारिकता नसते.
- सहज शिक्षण उत्स्फूर्तपणे घेता येते. उत्स्फूर्तपणे घडून आलेले अध्ययन आनंददायी व दीर्घकाळ स्मरणात राहणारे असते.

अशा प्रकारे जीवन जगण्याच्या प्रक्रियेत ज्ञान, कौशल्ये व क्षमता प्राप्त करण्यासाठी सतत शिकत राहणे महत्वाचे आहे. औपचारिक, अनौपचारिक व सहज शिक्षण

ISSN 2349-638X
www.aiirjournal.com

एकमेकांशी किती एकजिनसी आहे यावरच त्याची यशस्विता अवलंबून असते, त्यामुळे यांच्यामध्ये समन्वय साधने आवश्यक आहे.

**संदर्भग्रंथ**

१. उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक (१९९५) – हिरा आहेर, विद्या प्रकाशन, नागपूर
२. प्रगत शैक्षणिक तत्वज्ञान (२००६) – डॉ. अरविंद दुनाखे, नित्यनूतन प्रकाशन, पुणे
३. वर्तमान शिक्षणातील विचार प्रवाह (२००९) – प्रा. प्र.ल. नानकर, डॉ. संगीता शिरोडे, नित्यनूतन प्रकाशन, पुणे